# उभा

र सत्कार



यवर.

न सूर्याजीराव
क कल्याण
ल्हाध्यक्ष अरुण
र्वाह निधीच्या
ता शिंदे यांनी
कले.
विजय पाटील
स्ताविक केले.
कांबळे यांनी
लन विजय

# कॉमर्स कॉलेजमध्ये कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'वर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते.

कार्यशाळेचे उद्घाटन कौन्सिल ऑफ एजुकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते व डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स क्लस्टरचे समन्वयक टी. एल. कांबळे यांच्या उपस्थितीत झाले. प्रा. डॉ. के. जी. कांबळे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे डॉ. आर. जी. कोरबू यांनी अॅकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट, म. ह. शिंदे महाविद्यालयाचे डॉ. प्रकाश कुंभार यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि उच्च शिक्षणामधील आव्हाने, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा विद्यार्थी, शिक्षक, समाज आणि शैक्षणिक संस्था यांच्यावर होणारे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे आयोजन डॉ. ए. एस. बन्ने, डॉ. एस. बी. राजमाने, एम. एस. वाडकर, एस. आर. मुथाने, एम. एन. मुजावर, के. एम. टोपरानी, डी. एन. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा पाटील हिने केले.